नागपुर, मंगलवार, 6 जून 2017

दैनिक भास्कर

### कुलपति प्रो. मिश्र के हाथों पोस्टर का लोकार्पण

# हिंदी विवि में वृक्षारोपण कर मनाया पर्यावरण दिवस



ब्यूरो। वर्धा.

विश्व पर्यावरण दिवस के अवसर पर महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यालय में वृक्षारोपण किया गया। विश्वविद्यालय के कुलपति प्रो. गिरिश्वर मिश्र ने कबीर हिल पर पौधारोपण किया, तथा पर्यावरण का संदेश देने वाली दो पोस्टर का लोकार्पण इस अवसर पर किया। संबोधित करते हुए उन्होंने कहा कि विश्वविद्यालय परिसर को और हराभरा करने के लिए अधिक से अधिक पौधें लगाए जाएंगे, तथा बरसात के पानी के संचय के लिए अभियान शुरू किया जाएगा। राष्ट्रीय सेवा योजना की विवि की इकाई और पर्यावरण क्लब की ओर से आयोजित कार्यक्र म में राजेश्वर सिंह, ब्रिजेश पाटिल, राजेश लेहकपुरे, बी. एस. मिरगे, डॉ. राजेंद्र मुंडे, राजदीप राठौर, विजयपाल पाण्डे, राजेंद्र घोडमारे, अश्विन श्रीवास, विलास चौधरी, मनोज टिचकुले, विवेक तड़स, गिरीश उव्कार, प्रदीप पाचरूटकर, संजय रघाटाटे, पंकज नरड, विनोद फुलझेले, सचिन हाडके, सुरभि विप्लव, अमित मिश्रा, डॉ. अर्चना पाठ्या, शशिकांत वाठ, जया यादव, भूषण सूर्यवंशी अंकुश पराती, भूषण धानगुडे, दीपू कुमार, शत्रुघ्न सहित गणमान्य नागरिक उपस्थित हुए।

मंगळवार, ६ जून २०१७

पुण्यनगरी

# बालरंग, नाट्य, नृत्य व चित्रकला प्रशिक्षण कार्यशाळा

वर्धा : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील संपर्क कार्यालय, युवक बिरादरी आणि निळकंठ अकादमी ऑफ सोशल ॲक्टिविटी यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वविद्यालयात १० ते २२ जून दरम्यान ५ ते १५ वयोगटातील मुला-मुलींकरिता 'बालरंग' नाट्य, नृत्य आणि चित्रकला प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यशाळा महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या हबीब तनवीर सभागृहात दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळात होणार आहे. यावेळी कार्यशाळेत बालकांना विविध तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून नाटक, नृत्य आणि चित्रकलेचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. कार्यशाळेच्या समारोपाच्या यावेळी बालकांचे विविध कार्यक्रम सादर करण्यात येईल. यात सहभागी मुलांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

कार्यशाळेत सहभाग घेण्याचे आवाहन संयोजक बी. एस. मिरगे, सुरभी विप्लव आणि शिवम घाटे यांनी केले आहे.

देशोन्नती
मंगळवार, दि. ६ जून २०१७

# हिंदी विश्वविद्यालयात विद्यार्थ्यांकरीता नवी संधी देणारा अभ्यासक्रम

*प्रतिनिधी / ५ जून*

**वर्धा** : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात या वर्षापासून बी.ए. ऑनर्स अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. हिंदी, इंग्रजी, भाषाविज्ञान, पत्रकारिता, आणि मनोविज्ञान या विषयांमध्ये बी. ए. ऑनर्स सुरू करण्यात येईल. येथे एम.ए.,एमबीए,एम.एड.,एम.एस. डब्ल्यू.,बी.एड.,एम.एड. (एकीकृत) बी. वोक.,हे विषय आधीच शिकविण्यात येत आहे.

एम.फिल.करिता भाषा प्रौद्योगिकी,कम्प्यूटेशनल लिंग्विस्टिक्स, तुलनात्मक साहित्य, परफॉर्मिंग आर्ट्स, गांधी व शांती अध्ययन, स्त्री अध्ययन, दलित व जनजाती अध्ययन, बौद्ध अध्ययन, अनुवाद, प्रवासन व डायस्पोरा, जनसंचार, मानवविज्ञान, सोशल वर्क आणि शिक्षणशास्त्र विषय उपलब्ध आहेत. पीएचडी करिता भाषा प्रौद्योगिकी, गांधी व शांती अध्ययन, इंफॉर्मेटिक्स एंड लैंग्विज इंजीनियरिंग, दलित व जनजाती अध्ययन, जनसंचार, मानवविज्ञान, सोशल वर्क, शिक्षणशास्त्र विषय उपलब्ध आहेत.

पीजी डिप्लोमामध्ये भाषा शिक्षण, भाषाविज्ञान, भाषा-प्रौद्योगिकी, पीजीडीसीए, तुलनात्मक भारतीय साहित्य, भारतीय व पाश्चात्य कला तथा सौंदर्यशास्त्र, गांधी अध्ययन, स्त्री अध्ययन, देश संस्कृती भाषा आणि जेंडर, दलित विचार, बौद्ध अध्ययन, पालि भाषा व साहित्य, बौद्ध पर्यटन व गाइडिंग, तिब्बती भाषा व धर्म, अनुवाद, प्रयोजनमूलक हिंदी, निर्वचन,भारतीय डायस्पोरा, इलेक्ट्रॉनिक मीडिया, जाहिरात आणि जनसंपर्क,हिंदी पत्रकारिता,मराठी पत्रकारिता,एनजीओ प्रबंधन पाठ्यक्रम उपलब्ध आहेत. केंद्रीय विश्वविद्यालयात मुला-मुलींकरिता वसतिगृहाची सुविधा असल्याचे सांगण्यात आले आहे.

देशोन्नती

मंगळवार, दि. ६ जून २०१७

# हिंदी विश्वविद्यालयात 'बालरंग' नाट्य, नृत्य; चित्रकला प्रशिक्षण कार्यशाळा

**प्रतिनिधी / ५ जून**

**वर्धा :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविलयातील जनसंपर्क कार्यालय, युवक बिरादरी आणि नीलकंठ अकादमी ऑफ सोशल ऍक्टिविटी, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वविद्यालयात १० ते २२ जूनदरम्यान ५ ते १५ वयोगटातील मुला-मुलींकरिता 'बालरंग' नाट्य, नृत्य आणि चित्रकला प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेची वेळ दुपारी ४ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत राहील. विश्वविद्यालयाच्या हबीब तनवीर सभागृहात ही कार्यशाळा घेण्यात येणार असून यात मुलांना विविध प्रशिक्षकांकडून नाटक, नृत्य आणि चित्रकलेचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. कार्यशाळेच्या समारोपाच्या वेळी मुलांचा कार्यक्रम सादर करण्यात येईल. सर्व सहभागी मुलांना प्रमाण पत्र दिले जातील. कार्यशाळेत भाग घेण्याचे आवाहन संयोजक बी. एस. मिरगे, सुरभि विप्लव आणि शिवम घाटे यांनी केले आहे.

**जनसंपर्क कार्यालय, युवक बिरादरी, नीलकंठ अकादमीचे संयुक्त आयोजन**

सोमवार, 5 जून, 2017

प्रतिदिन अखबार

# हिंदी विवि में बालरंग नाट्य, नृत्य, चित्रकला प्रशिक्षण कार्यशाला 10 से

वर्धा, 4 जून- महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय का जनसंपर्क कार्यालय, युवक बिरादरी एवं नीलकंठ अकादमी ऑफ सोशल एक्टिविटी, वर्धा के संयुक्त तत्वावधान में विश्वविद्यालय में 10 से 22 जून के दौरान 5 से 15 वर्ष के आयुवर्ग के बच्चों के लिए ह्यबालरंगह्न नाट्य, नृत्य एवं कला प्रशिक्षण कार्यशाला का आयोजन किया जा रहा है. कार्यशाला का समय सायं 4 से 7 बजे तक रहेगा.

विश्वविद्यालय के हबीब तनवीर सभागार में बच्चों को विभिन्न प्रशिक्षकों द्वारा नाटक, नृत्य और चित्रकला का प्रशिक्षण दिया जाएगा. समापन समारोह में बच्चों द्वारा सांस्कृतिक कार्यक्रम प्रस्तुत किया जाएगा तथा सभी सहभागी बच्चों को प्रमाणपत्र दिए जाएंगे. कार्यशाला में सहभागी होने की अपील संयोजक बी.एस. मिरगे, सुरभि विप्लव एवं शिवम घाटे ने की है.

ज्ञान शांति मैत्री

मंगळवार, दिनांक ०६ जून २०१७

महासागर

पर्यावरण दिवस : हिंदी विश्वविद्यालयात वृक्षारोपण

# कुलपति प्रो. मिश्र ने किया भित्ती चित्र का लोकार्पण



प्रतिनिधी,
वर्धा,०५,

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. विश्वविद्यालयाचे कुलगुरु प्रो. गिरीश्वर मिश्र यांनी कबीर हिल वर वृक्षारोपण केले आणि पर्यावरणाचा संदेश देणा-या दोन भित्ती चित्रांचे लोकार्पण केले. ते म्हणाले की विश्वविद्यालयाचा परिसर अधिक हिरवागार करण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावण्यात येणार आहे. पावसाचे पाणी अडवून त्याचा संचय करण्यासाठी एक अभियान हाती घेण्यात आले आहे असेही ते म्हणाले. राष्ट्रीय सेवा योजना आणि पर्यावरण क्लब यांच्या वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी रासेयो आणि पर्यारण क्लबचे संयोजक राजेश लेहकपुरे रासेयोचे स्वयंसेवक विद्यार्थी यांच्यासह राजेश्वर सिंह, ब्रिजेश पाटिल, राजेश लेहकपुरे, बी. एस. मिरगे, डॉ. राजेंद्र मुंढे, सुरभि विप्लव, अमित मिश्रा, राजदीप राठौर, विजयपाल पाण्डे, राजेंद्र घोडमारे, अश्विन श्रीवास, विलास चौधरी, मनोज टिचकुले, विवेक तड्स, गिरीश ठवकार, प्रदीप पाचरूटकर, संजय रघाटाटे, पंकज नरड, विनोद फुलझेले, सचिन हाडके, डॉ. अर्चना पाठ्या, शशिकांत वाठ, जया यादव, भूषण सूर्यवंशी अंकुश पराती, भूषण धानगुडे, दीपू कुमार, शत्रुघ्न सहित अध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी तसेच शहरातील गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंगळवार, दिनांक ०६ जून २०१७

महासागर

# हिंदी विश्वविद्यालयात 'बालरंग' नाट्य, नृत्य, चित्रकला प्रशिक्षण कार्यशाळा

## जनसंपर्क कार्यालय, युवक बिरादरी, नीलकंठ अकादमीचे संयुक्त आयोजन

**प्रतिनिधी,**
**वर्धा, दि.०५,**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील जनसंपर्क कार्यालय, युवक बिरादरी आणि नीलकंठ अकादमी ऑफ सोशल एक्टिविटी, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वविद्यालयात १० ते २२ जून दरम्यान ५ ते १५ वयोगटातील मुला-मुलींकारिता 'बालरंग' नाट्य, नृत्य आणि चित्रकला प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. कार्यशाळेची वेळ दुपारी ४ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत राहील.

विश्वविद्यालयाच्या हबीब तनवीर सभागृहात ही कार्यशाळा घेण्यात येणार असून यात मुलांना विविध प्रशिक्षकांकडून नाटक, नृत्य आणि चित्रकलेचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. कार्यशाळेच्या समारोपाच्या वेळी मुलांचा कार्यक्रम सादर करण्यात येईल. सर्व सहभागी मुलांना प्रमाण पत्र दिले जातील. कार्यशाळेत भाग घेण्याचे आवाहन संयोजक बी. एस. मिरगे, सुरभि विप्लव आणि शिवम घाटे यांनी केली आहे.

मंगळवार, ६ जून २०१७

# पुण्य नगरी

## ऋषिता रायचे यश

वर्धा : नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या सीबीएससी परीक्षेच्या निकालात स्कूल ऑफ स्कॉलर्सची



ऋषीता राय हिने सर्व विषयात ए १ श्रेणी घेवून सीजीपीए प्राप्त केला. भविष्यात डॉक्टर बनुन सिमेवर लढणाऱ्या सैनिकांची आरोग्य सेवा करणार असल्याचे तिने सांगितले आहे. आपल्या यशाचे श्रेय शिक्षक रोशन मॅडम, आईवडीलांना दिले आहे. तिने दहावीत ९४.४ टक्के गुण प्राप्त केले आहे. तिच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

मंगळवार, ६ जून २०१७

# तरुण भारत

## हिंदी विद्यापीठात वृक्षारोपण

वर्धा : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यापीठात वृक्षारोपण करण्यात आले. कुलगुरू प्रो. गिरीश्वर मिश्र यांनी कबीर हिलवर वृक्षारोपण केले आणि पर्यावरणाचा संदेश देणाऱ्या दोन भित्तिचित्रांचे लोकार्पण केले. विश्वविद्यापीठाचा परिसर अधिक हिरवागार करण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावण्यात येणार आहेत. पावसाचे पाणी अडवून संचय करण्यासाठी एक अभियान हाती घेण्यात आले असल्याचे मिश्र म्हणाले. राष्ट्रीय सेवा योजना आणि पर्यावरण क्लबच्या वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी रासेयो आणि पर्यावरण क्लबचे संयोजक राजेश लेहकपुरे, रासेयोचे स्वयंसेवक, विद्यार्थी यांच्यासह राजेश्वर सिंह, ब्रिजेश पाटील, राजेश लेहकपुरे, बी. एस. मिरगे, डॉ. राजेंद्र मुंढे, अध्यापक, अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील गणमान्य नागरिक उपस्थित होते.

नागपुर, मंगलवार, 6 जून 2017

दैनिक भास्कर



# ऋषिता राय की सफलता

ब्यूरो|वर्धा : स्कूल आफ स्कॉलर्स, वर्धा का गौरव बढ़ाने में ऋषिता राय की सफलता ने एक कड़ी जोड़ी है। सीबीएसई द्वारा घोषित दसवीं की परीक्षा परिणाम में महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय की ऋषिता राय ने सभी विषयों में ए वन श्रेणी तथा सी.जी.पी.ए. में दस में दस अंक प्राप्त किए। भविष्य में चिकित्सक बनकर देश के लिए सरहद पर लड़ रहे सैनिकों की सेवा करने का सपना संजोई ऋषिता का कहना है कि सफलता की राह में उसका यह पहला कदम है। अध्ययन के क्षेत्र में वास्तविक प्रवेश अब होना है इसलिए अभी सिर्फ और सिर्फ पढ़ाई करनी है तथा लक्ष्य को पाने के लिए सकारात्मक सोच के साथ कड़ी मेहनत करनी है। इस परीक्षा में सफलता का श्रेय शिक्षकों, खासकर रोशन मैडम तथा माता-पिता के मार्गदर्शन को देती है। ऋषिता राय को दसवीं की परीक्षा में 94.4 प्रतिशत अंक मिलने पर उसके शिक्षकों, मित्रों तथा सोशल मीडिया के सैकड़ों शुभ चिंतकों ने बधाई और शुभकामनाएं दीं।

मंगळवार, ६ जून २०१७

पुण्य नगरी

# टेकडीवरील श्रमदानासाठी वर्धेकर एकवटले

**वर्धा :** येथील म्हाडा कॉलनी जवळील आयटीआय टेकडीचा परिसर हिरवागार करण्याच्या हेतूने जागतिक पर्यावरण दिनाच्या पूर्वसंध्येला आयोजित महाश्रमदानात वर्धेकर मोठ्या संख्येने एकवटले. यावेळी प्रचंड प्रतिसादात प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करत पावडे, कुदळ हाती घेऊन सुमारे दोन हजार खड्डे तयार केले.

निसर्ग सेवा समिती, जिल्हाधिकारी कार्यालय व उपवनसंरक्षक कार्यालय यांच्या पुढाकाराने ४ जून रोजी पहाटे ६ वाजतापासून श्रमदानास सुरुवात करण्यात करण्यात आली. यावेळी अबाल वृद्धांनी सहभाग घेत सकाळी ९ वाजेपर्यंत तब्बल तीन तास खड्डे खोदून आपल्या सामाजिक जाणिवेचा परिचय दिला. या श्रमदानात महिलांचाही मोठ्या संख्येने सहभाग होता. श्रमदानात जिल्हाधिकारी शैलेश नवाल, खासदार रामदास तडस, उपवनसंरक्षक दिगंबर पगार, तहसीलदार राऊत यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय, वनविभागातील कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यातून वर्धा शहराला हिरवेगार करण्याचा उत्साह अधोरेखांकित करणारा ठरला.

जागतिक पर्यावरण दिनाच्या पूर्वसंध्येला त्या श्रमदानातून तयार करण्यात आलेल्या खड्ड्यात १ ते ७ जुलै दरम्यान ज्यात्माध्ये काळी माती भरुन वृक्षारोपण करण्यात येईल. समितीद्वारे वर्ष २००० मध्ये याच टेकडीच्या काही भागात ८०० वृक्षा लावून त्याचे संगोपण गत १७ वर्षांपासून करण्यात येत आहे. पुढेही या श्रमदानाच्या माध्यमातून जबाबदारी वाढली असून पुढील वृक्ष लागवड व त्याचे संवर्धन योग्य पद्धतीने होईल, असा विश्वास निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे यांनी व्यक्त केला.



याप्रसंगी जिल्हाधिकारी शैलेश नवाल, खासदार रामदास तडस व उपवनसंरक्षक पगार यांच्या हस्ते निसर्ग संदेशचे प्रकाशन करण्यात आले. तसेच उपस्थितांच्या हस्ते आयटीआय टेकडीवर रस्त्याच्या कडेला वृक्ष लावण्यात आले. वृक्षाच्या रक्षणाकरिता अनिल पटेल, डॉ. राजेंद्र बोरकर, गोपी मते, डॉ. रंभा सोनाये, इमरान राही, निळकंठ पिसे यांनी वृक्षसंरक्षक दिलेत. या श्रमदानात हिंदी विश्वविद्यालय, बहार नेचर फाऊंडेशन, आपले सरकार, आधारवड, श्रमिक पत्रकार संघ, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वैद्यकीय जनमंच, जनहित मंच, सक्षम वर्धा, युवा सोशल फोरम, वर्धा सोशल फोरम, राष्ट्रसेवा दल, पोलीस विभाग, निवृत्त पोलीस ऑफीसर्स कर्मचारी, विवेकानंद केंद्र, गुरुदेव सेवा मंडळ, निवृत्त अभियंता संघ, जिल्हा परिषद शिक्षक संघ तसेच इतर सामाजिक संघटनांचा सहभाग होता.